**शालेय स्तरावर पर्यावरण सेवा योजना राबविण्यासाठी निधी मुक्त करण्याबाबत..**

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१०/प्र.क्र.८/तां.क.३
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ मार्च, २०१२.

पहावे : १) या विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दि.१४ जानेवारी, २०११ व दि.२४ जून,२०११.
२) पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे यांचा दि.०३ फेब्रुवारी, २०१२ चा पत्र.

**प्रस्तावना:**

सध्या शालेय स्तरावर 'पर्यावरण' विषय अनिवार्य करण्यात आला आहे. परंतु, हा विषय केवळ वर्गामध्ये न शिकवता निसर्गाच्या सानिध्यात प्रत्यक्ष कृतीच्या आधारे या विषयाबद्दल मुलांच्या मनात जागृती व चेतना निर्माण करुन, बालपणापासूनच असे आधारस्तंभ तयार करणे गरजेचे आहे, जेणेकरुन भावी पिढी 'पर्यावरण संवेदनशील व सजग' होईल.याच उद्देशाने महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये "पर्यावरण सेवा योजना" (Environmental Service Scheme(ESS)) राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. योजनेच्या सुरुवातीस प्रथमत: ३ वर्षाच्या कालावधीसाठी केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयामार्फत "सेंटर ऑफ़ एक्सलन्स" म्हणून नियुक्त केलेले "पर्यावरण शिक्षण केंद्र" पुणे (Centre for Environment Education, a centre of excellence designated by MoEF), ही संस्था राज्यस्तरावर पर्यावरण विभागाच्या वतीने योजनेची अंमलबजावणी करण्यास जबाबदार असेल. तरी उपरोक्त कार्यक्रम राबविण्यासाठी सदर संस्थेस दुस-या हप्त्याच्या निधी मुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

शालेय स्तरावर पर्यावरण कार्यक्रम राबविण्यासाठी "पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे" यांना संदर्भाधीन दि.२४ जून, २०११ चा शासन निर्णयाद्वारे रू.४०.०० लक्ष रोख मुक्त करण्यात आलेला आहे. आता पुढील हप्ता म्हणून या शासन निर्णयान्वये **एकूण रू.२०.०० लक्ष (रूपये वीस लक्ष फक्त)** एवढी रक्कम मंजुर व मुक्त करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. मंजुर व मुक्त करण्यात येत असलेल्या रू.२०.०० लक्ष निधीबाबत प्रस्तावित खर्चाचे बाबनिहाय मासिक विवरणपत्र तात्काळ सादर करावे.
२. या योजनेतंर्गत प्राप्त होणारा निधी हा राष्ट्रीयकृत बँकेत उघडलेला स्वतंत्र खात्यात जमा करावा. बँकेत ठेवलेल्या रकमेवर मिळणारे व्याज याच खात्यात जमा करावे.
३. हे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करावे. योजनेतंर्गत मंजूर विशिष्ट कामासाठी अदा केलेली वा मान्य केलेली रक्कम त्याच कामासाठी राज्य शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणे व विहीत कालमर्यादेत मान्य केलेल्या खर्चाच्या मर्यादेत खर्च करणे आवश्यक आहे. ही रक्कम इतर दुस-या कोणत्याही कामासाठी वापरता येणार नाही किंवा वळती करता येणार नाही.
४. पर्यावरण शिक्षण केंद्र,पुणे यांनी प्रत्येक आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र वर्ष संपल्यानंतर एप्रिलच्या १५ तारखेपर्यंत पर्यावरण विभागास सादर करावे. उपयोगिता

प्रमाणपत्र सादर करतेवेळी बँकेतील या खात्यावर झालेल्या व्यवहाराच्या नोंदी दर्शविणा-या पासबुकाची साक्षांकित प्रत सोबत जोडण्यात यावी. सहायक अनुदानामधून करण्यात येणा-या खर्चाच्या रकमेचे लेखे प्रचलित लेखा संहितेनुसारच ठेवण्यात यावेत व त्याचे लेखापरिक्षण करण्यात यावे व त्याचा अहवाल पर्यावरण विभागास पाठविण्यात यावा.

५. राज्य शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटींचे व शर्तीचे पालन करणे तसेच संदर्भाधीन दि.१४ जानेवारी, २०११ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे "पर्यावरण शिक्षण केंद्र" पुणे यांच्या वर बंधनकारक राहील.

२. सदर रक्कम अधिदान व लेखा अधिकारी यांच्या मार्फत कोषागारातून काढून "पर्यावरण शिक्षण केंद्र,पुणे" यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री.दे.कं.मानकर, अवरसचिव, पर्यावरण विभाग व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री.श्या.ना.धकाते, सहसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी **"पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे" (Centre for Environment Education, Pune)** यांना रु.२०.०० लक्ष (अक्षरी रुपये वीस लक्ष फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

३. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.यू-४, ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण,०४,प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण १०३,वायू व जल प्रदूषण प्रतिबंध-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२)(१३) पर्यावरण विषयक जनजागृती, शिक्षण व वातारण बदल कृति योजना (३४३५ १३०२) ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेतर) या या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०११-१२ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात उपरोक्त कार्यक्रमासाठी एकुण रू.३००.०० लक्ष एवढी तरतुद मंजुर व अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अंदाज २०११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३ दिनांक ५-३-२०१२च्या सूचनांनुसार वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र १००८/विनियमन, दिनांक १५ मे २००९ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला उप विभाग तीन मधील अनुक्रमांक ४, नियम क्रमांक २७(२) अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन निर्गमित करण्यात येतआहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दे.कं.मानकर)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
कार्यक्रम संचालक, पर्यावरण शिक्षण केंद्र, (CEE) पुणे
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२.मुंबई/नागपूर,
संचालक, लेखा व कोषागरे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग, व्यय -१६/अर्थसंकल्प -७, मंत्रालय, मुंबई,
नियोजन विभाग, (का-१४६२) मंत्रालय, मुंबई,
सर्व कार्यासने, पर्यावरण विभाग.मंत्रालय, मुंबई.
रोख शाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, पर्यावरण विभाग, मुंबई.